UNNATI
Institute for
Social & Educational Change

# खबरबात

## जानेवारी ते मार्च २०२४







# ठळक घडामोडी

## Training to the Staff for Effective Work Management

आपल्या कामाचे मासिक, दैनिक नियोजन कसे करावे हे शिकण्यासाठी इब्राहीम अफगाण यांनी संस्थेतील प्रमुख सदस्यांसोबत एक कार्यशाळा घेतली व त्यानंतर २ महिने दर आठवड्याला त्यावर व्यक्तिगत मार्गदर्शन (mentoring) केले. यामधून आठवडी व दैनिक कामाचे नियोजन करण्याबाबतीत कार्यकर्त्यांना स्पष्टता आली. आयत्यावेळी येणाऱ्या कामांसाठी मोकळा वेळ ठेवणे गरजेचे आहे म्हणजे नियोजित केलेली कामे पुढे न ढकलता त्याच दिवसात पूर्ण करता येतील. कामे पूर्ण करण्याची अंतिम तारीख लक्षात घेऊन कामांचा क्रम लावणे गरजेचे आहे. सोबतच आपले कामाचे आठवडी नियोजन करताना इतरांसोबत असणाऱ्या कामासाठी सहकाऱ्यांची वेळ घेऊन त्या कामासाठी नियोजन करणे गरजेचे आहे अशा बऱ्याच बाबींची स्पष्टता आठवडी mentoring सभेतून सदस्यांना येत गेली.

## Systems and Processes for Effective Work Streaming

दर आठवड्याला समन्वय सभा, महिन्यातून दोन वेळा व्यवस्थापन सभा, महिन्यातून एकदा कार्यालय-निहाय स्टाफ सभा अशा विविध सभा घेतल्या जातात. या वेळपासून दर आठवड्याला प्रत्येक कार्याक्रमासाठी साप्ताहिक कार्य आढावा सभा घेण्यास सुरुवात करण्यात आली. संस्थेच्या संचालक हेमांगी जोशी यांचे आवश्यक बाबींवर थेट मार्गदर्शन कार्यक्रमास मिळावे आणि त्यांना कार्यक्रमातील प्रमुख बाबींबद्दल अवगत करावे या उद्देशाने या सभा घेतल्या जातात . या सभांमुळे कामांना गती मिळाली आहे. कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणींवर वेळोवेळी मार्गदर्शन मिळाल्यामुळे तत्काळ कृती होते. कार्यक्रमाशी संबंधित चर्चा झाल्याने वेळोवेळी सुधारणा होतात, कामे प्रलंबित राहत नाहीत.

# ठळक घडामोडी

## Participation of Field Staff in the Monthly Work Presentations

काम, कामाचे नियोजन, धोरण निश्चिती या साऱ्या बाबींमध्ये तळातील कार्यकर्त्यांपासून व्यवस्थापकीय मंडळींपर्यंत सर्वांचा सहभाग असावा असा उन्नतीचा आग्रह असतो. यामुळे कामाची ओनरशिप प्रत्येकाच्या मनात निर्माण होते, आत्मविश्वास वाढतो, कामाची, त्यामागील भूमिकेची सर्वांना स्पष्टता येते. प्रत्येक कार्यक्रमाचे दर महिन्याला MEL सादरीकरण होते. शहापूर संघातील केवळ वरिष्ठ व्यक्तीच यामध्ये सहभागी असत. या वेळपासून शहापूर येथील सर्व शाळा सख्या कार्यक्रम उद्दीष्ट पुर्तीसाठीच्या एमईएल मंडणीत सक्रीय सहभागी होऊ लागल्या.

## Data Management Work Started

काम करीत असताना दर महिन्याला बरीच विदा (data) संकलित करावी लागते. जसे, वाचकांनी वाचन केलेली पुस्तक संख्या, महिनानिहाय जास्त वेळा घेतलेली पुस्तक संख्या, गावानुसार देवघेव दिवस, मुलांची वर्गातील उपस्थिती, वर्गात झालेली सत्रे इत्यादी. या विदेमधून आवश्यक ते अहवाल तयार केले जातात. हे काम संगणकात manually केले जात होते.  परंतु ही विदा भरण्यात स्टाफचा बराच वेळ खर्च होत होता. हा अहवाल automatic पद्धतीने तयार व्हावा, स्टाफचा वेळ वाचावा व त्यांना कार्यक्रम अंमलबजावणीसाठी पुरेसा वेळ मिळावा यासाठी data management संदर्भात वैखरी कंपनीची मदत संस्थेने घेतली आहे.

## उन्नतीच्या कामाचे सादरीकरण

बीएसआय या संस्थेने त्यांच्या सहयोगी संस्थांची सभा ८ फेब्रुवारी २०२४ ला हिंदू जिमखाना पुणे येथे आयोजित केली होती. यामध्ये उन्नतीने गाव वाचनालय ही संकल्पना व उन्नतीच्या कामाचे सदरीकरण केले.यामध्ये सहभागी १२ सामाजिक संघटनांनी स आपापल्या कामाचे सादरीकरण केले.

## आदिवासी गावात भरली पुस्तक जत्रा

गाव वाचनालय चालविल्या जाणाऱ्या कोहा, जनुना, खिरकुंड खु., खिरकुंड बु., या चार गावांमध्ये जागतिक मातृभाषा दिनानिमित्त पुस्तक जत्रा' भरवण्यात आली. यामध्ये प्रत्येक गावात सहा प्रकारच्या पुस्तकांचे स्टॉल लावण्यात आले होते. यामध्ये १. कोरकू भाषिक पुस्तके २. कला विषयातील पुस्तके ३. गोष्टींची पुस्तके ४. महिला मुली विषयातील पुस्तके ५. आनंदी अंक ६. चित्र पुस्तके. लोकांना चित्र काढणे, कोडी सोडवणे, प्रश्नोत्तरे असे विविध उपक्रम घेतले गेले.

या प्रक्रियेमध्ये आम्हाला चारही गावांच्या तुलनेत जनुना व कोहा या दोन गावात भरपूर प्रतिसाद मिळाला. यामध्ये गावातील महिला-पुरुष व मुली-मुलगे यांनी लावलेल्या स्टॉल मधील प्रत्यक्ष कृती करून पाहिलेत.







# क्षेत्र घडामोडी

## उन्नती संस्थेला स्वाधार संस्थेची भेट

पुण्याच्या स्वाधार संस्थेतील ७ कार्यकर्त्यांनी उन्नती संस्थेच्या अकोट मधील रुईखेड येथील प्रकल्पाला पूर्ण दिवस भेट दिली. स्वाधार संस्था ही महिला सक्षमीकरण, आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करते. उन्नती संस्थेचे वाचनालय प्रकल्पाच्या माध्यमातून चालणारे काम, गाव वाचनालय मध्ये होणारी देवघेव, वाचू आनंदे वर्ग पाहिले. हे उपक्रम राबविणाऱ्या कार्यकर्त्यांशी त्यांनी चर्चा केली.



## वाचनालयासाठी शाळेने खोली दिली

शहापूर प्रकल्पातील बाबरे आश्रमशाळेत वाचनालयांसाठी स्वतंत्र वर्ग खोली नसल्याने संगणक रूममध्ये किंवा अन्य वर्गात ५ वी ते ७ वीच्या मुलांसोबत वर्ग घेतले जात होते. याबाबत शाळेशी चर्चा केल्यावर फेब्रुवारी महिन्यापासून शाळेतील एक स्वतंत्र वर्गखोली उन्नती चालवत असलेल्या वाचनालय प्रकल्पासाठी देण्यात आली.

## वर्धा संमेलन अहवाल व व्हिडीओ निर्मिती

जानेवारी २०२३ मध्ये वर्धा येथे बहुभाषिक शिक्षण – संवाद, वार्तालाप व चिंतन" या विषयावरील राज्यस्तरीय संमेलन गांधी आश्रम, वर्धा येथे आयोजित केले होते. त्यातील सत्रांच्या अहवाल लेखन व व्हिडीओ निर्मितीच्या कामाला सुरुवात झाली आहे. उन्नतीच्या यु ट्युब चानल वर हे व्हिडीओ टाकले जातील. ही दोन्ही कामे झाली की त्याची लिंक पुढील खबरबात मध्ये तुम्हाला देऊच.



# क्षेत्र घडामोडी

## कलोत्सव: मुलांच्या आनंदाचे ठिकाण

कलेची कृती म्हटलं की मुलांना कितीही वेळ दिला तर करायला तयार असतात. मुलांना पूर्ण दिवसभर जरी कला सत्र चालवले तरी त्यांची तयारी असते. असे असले तरी शाळेमध्ये किंवा मुलांच्या अवती-भोवतीच्या गावातील वातावरण मध्ये मुलांना कलाकाम अनुभवायला मिळत नाही.

उन्नतीने चारही शाळांमध्ये (जनुना, डांगरखेड, खिरकुंड बु., कोहा) मुलांसोबत २६ ते २९ डिसेंबर हा आठवडा कलोत्सव घेतला. यामध्ये प्रामुख्याने मातीकला, कागदकला, चित्रकला घेण्यात आले.





खिरकुंड बु च्या शाळेत एका सत्रात वर्ग २ री ते ५ वीच्या मुलांसोबत कागदकाम घेतले गेले. यामध्ये शाळेच्या शिक्षिका मालवे मॅडम यांनी कागदी भिंगरी तयारी करून दाखवली. कृती ११ वाजता सुरू झाली आणि १:३० वाजता संपली. या दरम्यान स्टेप बाय स्टेप मॅडम कृती करून दाखवत होत्या, तसे मुले करत होती. मध्ये मध्ये मुलांना मदतीची गरज पडत होती तिथे मी मदत करत होतो. एरवी सारखे सुसू चे कारण काढून मुले बाहेर पळत असतात, पण या दोन ते अडीच तासात अगदी थोडी मुले उठून सुसूला गेली होती. अर्ध्यापेक्षा जास्त मुले कृतीत रमली होती. कोणीच कोणाला त्रास देत नव्हते. सर्वांचे चित्त भिंगरी तयार करण्यात होते. माझी भिंगरी कधी तयार होईल हाच विचार मुलांचा होता. शेवटी तयारी झालेली भिंगरी बघून मुलांचा आनंद बघण्याजोगा होता. कलेत मुले नेहमी सक्रिय असतात. शिकण्यात रमलेली असतात. कारण, त्यात आनंद असतो.


# क्षेत्र घडामोडी

## आमच्या कथा आमच्या भाषेत

एकूणच महाराष्ट्रातील ललित साहित्यात आदिवासी जीवनसाहित्य अत्यल्प आहे. त्यांच्या जगण्याच्या संदर्भातील कथांचा मोठा अभाव प्रौढ आणि बालसाहित्यात आहे. आम्ही वाचनालय कार्यक्रम राबवत असल्यामुळे ही बाब सातत्याने व प्रकर्षाने आमच्या लक्षात येत गेली. आपल्या परीने यावर एक उपाय म्हणून आम्ही काम करीत असलेल्या आदिवासी समुदायातील लोकांकडून गोष्टी लिहून घेण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत या काळात आम्ही दोन उपक्रम केले:

१) अकोला जिल्ह्यात जनुना व खिरकुंड बु या दोन गावांमधील १५ ते २५ वयोगटातील महिला व मुली उन्नतीसोबत जोडल्या गेल्या आहेत. त्यांना गोष्ट लेखन करण्यास प्रवृत्त करण्यात आले. त्यांच्या जगण्यावर आधारित कथा निर्मितीची प्रक्रिया गाव कार्यकर्ती मार्फत घेण्यात आली. त्यांचे जीवनानुभव, त्यांना असणाऱ्या समस्या, त्यांचे सण समारंभ या विषयावर त्यांनी कथालेखन केले आहे. या दोन्ही गावांतील महिला व मुलींनी १८ कथा लिहिलेल्या आहेत.

२) ठाणे जिल्ह्यात शहापूर येथील उन्नती काम करत असलेल्या बाबरे, शेणवे, कोठारे, टाकी पठार आणि साकुर्ली अशा ५ शाळांमध्ये २१ फेब्रुवारी रोजी मातृभाषा दिनानिमित्त इयत्ता ५ वी ते ७ वीच्या मुलांनी म.ठाकर, कातकरी, वारली आदी भाषांमध्ये १८ गोष्टी अनुवादीत करत कार्यक्रमाला अर्थ प्राप्त करून दिला. यामध्ये एकूण १९ मुली आणि ६ मुलांनी गोष्टी अनुवादीत करण्यात सहभाग घेतला.





## जागतिक मातृभाषा दिवस साजरा झाला

२१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषा दिवस म्हणून संपूर्ण जगभर साजरा केला जातो तसा तो आम्हीही करतो. यावर्षी आम्ही शाळेच्या संयुक्त विद्यमाने मातृभाषा दिन आदिवासी गावांमध्ये साजरा केला. या दिनाची तयारी आठवडाभर आधीपासून शाळांतील, शिक्षक, विद्यार्थिनी, विद्यार्थी आणि उन्नतीचे कार्यकर्ते करीत होते.

अकोला जिल्ह्यात डांगरखेड, खिरकुंड बु, खिरकुंड खुर्द, जनुना आणि कोहा या गावांमध्ये शाळेतील आवारात, शाळेच्या वेळेत हा सोहळा साजरा केला. यामध्ये कोरकू भाषेतील पारंपारिक गीत लोकांनी म्हटले, कोरकू भाषेतील गोष्टींच्या पुस्तकांचे मुलांनी वाचन केले, गाव वाचनालय देवघेव प्रक्रियेत सहभागी असणारे पालक यांनी पुस्तक वाचन केले.

ठाणे जिल्ह्यात शहापूर येथील उन्नती काम करत असलेल्या बाबरे, शेणवे, कोठारे, टाकी पठार आणि साकुर्ली अशा ५ शाळांमध्ये मराठी दिन साजरा करणाऱ्या शाळांमध्ये प्रथमच मातृभाषा दिन साजरा करण्यात आल्याची प्रतिक्रीया येथील शिक्षकांनी दिली आहे.






यामध्ये येथील मुलांनी उन्नती वाचनालयातील गोष्टींची पुस्तके निवडून ती त्यांच्या भाषांमध्ये अनुवादीत केली. तर काही मुली-मुलांनी त्यांच्या संस्कृतीतील विविध गाणी सादर केली. बाबरे येथील मुलांनी कातकरी, साकुर्ली, टाकी पठार आणि कोठारे येतील मुलांनी म ठाकूर, तर शेणवे येथील मुलींनी म. ठाकूर, वारली आदी भाषांमध्ये गोष्टी आणि गाणी तयार केली सादर केली. यामध्ये शाळेतील सगळ्याच विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांना स्व-भाषेतील कार्यक्रम ऐकण्याची संधी मिळाली. तर शिक्षकांनाही मुले त्यांच्या भाषेत बोलताना पाहून कौतुक वाटले. या कार्यक्रमातील उन्नती काम करत असलेल्या मुलांव्यतिरिक्त अन्य वर्गातील मुले, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्ग देखील उपस्थित होता.

# क्षेत्र घडामोडी

## मुलांची सहल

उन्नती संस्था अकोला क्षेत्रात ज्या शाळांतील वर्गांसोबत काम करते त्या मुलांची वार्षिक सहल नेली जाते. या वर्षी अनेक वर्षांनंतर शाळांनी सहल काढली. म्हणून संस्थेने स्वतंत्र सहल न काढता, शाळेने काढलेल्या सहलीत सहभाग घेतला.

जनुना येथील १११ विद्यार्थ्यांनी अमरावतीमधील वॉटरपार्कची मजा अनुभवली. डांगरखेड येथील ४९ तर कोहा येथील ४४ विद्यार्थ्यांनी नजीकच्या धरण आणि परिसराची ओळख करून घेतली. खिरकुंड बु. येथील २२३ मुलांना गावानजीकच्या गावदेवी मंदिरात सहलीचा आनंद लुटला.







Unnati Institute for Social & Educational Change

# क्षेत्र घडामोडी

## मुलांच्या चाचण्यांचे निकाल

उन्नतीचे शिकू आनंदे वर्ग (मातृभाषा आधारित बहुभाषिक शिक्षण वर्ग) वर्षभर चालतात. या वर्गांची वर्षातून दोन वेळा चाचणी घेतली जाते. वर्ष अखेरची चाचणी ११ ते १८ मार्च २०२४ दरम्यान घेण्यात आली. त्याचे निकाल पुढीलप्रमाणे:

### लेखन चाचणीत मुलांमध्ये वाढलेली क्षमता

| | Marks % | % of Children * जनुना | % of Children * डांगरखेड | % of Children *खिरकुंड बु. वर्ग 1 | % of Children **खिरकुंड बु. वर्ग 2 | % of Children ** कोहा |
|---|---|---|---|---|---|---|
| झकास | 100 | 0 | 31 | 4.76 | 0 | 5.6 |
| उत्तम | 75 To 99 | 73 | 56 | 47.62 | 70 | 38.9 |
| चांगला | 61 To 74 | 0 | 6 | 19.05 | 10 | 22.2 |
| समाधानकारक | 50 To 60 | 5 | 6 | 9.52 | 10 | 16.7 |
| बरा | 35 To 49 | 9 | 0 | 0 | 5 | 5.6 |
| असमाधानकारक | 01 To 34 | 9 | 0 | 19.05 | 0 | 5.6 |
| कायम अनुपस्थित | 0 | 5 | 0 | 0 | 5 | 5.6 |

### मुलांच्या वाचन चाचणीतील क्षमता

| | मुळाक्षर गट | | चौदाखडी गट | | जोडाक्षर गट | | वाचन गट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जुले २३ | मार्च २४ | जुले २३ | मार्च २४ | जुले २३ | मार्च २४ | जुले २३ | मार्च २४ |
| *जनुना | 36% | 9% | 64% | 9% | 0% | 5% | 0% | **73%** |
| *डांगरखेड | 38% | 0% | 63% | 6% | 0% | 13% | 0% | **81%** |
| *खिरकुंड बु. वर्ग १ | 90% | 29% | 10% | 14% | 0% | **48%** | 0% | 10% |
| **खिरकुंड बु. वर्ग २ | 100% | **70%** | 0% | 30% | 0% | 0% | 0% | 0% |
| **कोहा | 100% | **44%** | 0% | 17% | 0% | 17% | 0% | 22% |

(मुळाक्षर गट: मुळाक्षर वाचन कौशल्यात सुधारणा आवश्यक; चौदाखडी गट: चौदाखडी वाचनापर्यंत आलेली मुले: जोडाक्षर गट: जोडाक्षर वाचनापर्यंत आलेली मुले: वाचन गट: वाचन येऊ लागलेली मुले

* जुलै २०२२ पासून वर्ग सुरु झाले आहेत.

** सप्टेंबर २०२३ पासून सुरु झाले आहेत.

मागे असणाऱ्या मुलांसोबत या शैक्षणिक वर्षात काम केले जाईल.

UNNATI
Institute for
Social & Educational Change

# ठळक घडामोडी

## बाह्यकार्यशाळेत सहभाग

विषय- आदिवासी मुलांचे आरोग्य: पुणे येथे आरोहन या संस्थेच्या वतीने १७ व १८ जानेवारी रोजी दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, ज्यामध्ये आदिवासी मुलांच्या आरोग्याच्या आणि शिक्षणाच्या अनुषंगाने चर्चासत्र व मांडणी झाली. एकूण जी चांगली परिस्थिती दिसत आहे, ती तशी नसून फुगवून दाखवली जाते आहे, तर काही ठिकाणी जुन्या गोष्टीला नवीन वेष्टन घालून विकत असल्याचा आरोप सरकारवर होत आहे. त्यामुळे या बाबत संघटीत होऊन, वाटाघाटीच्या माध्यमातून काम करावे लागेल यावर एकमत झाले. उन्नती संघाकडून एक सदस्य या कार्यशाळेत सहभागी झाली होती.

## शाळासखीचा सत्कार

बाबरे शाळेतील उन्नतीच्या साक्षरता वर्गातील मुलांमध्ये अनेक सकारात्मक बदल दिसतात जसे, ज्या मुलांना मुळाक्षर वाचनसुद्धा जमत नव्हते ती आता वाचन करू लागली, पुस्तक घेऊन वाचन करताना मुले दिसू लागली, शालेय परीपाठाच्या वेळी मुले गोष्टी सांगू लागली, व्यक्त होऊ लागली. यासाठी वार्षिक सांस्कृतिक संमेलनात शाळेने संस्थेची कार्यकर्ती ‘भारती जाधव’ या शाळासखीचा सत्कार केला.



# क्षेत्र घडामोडी

## शिक्षक अभ्यासगट (अकोला जिल्ह्यात)

शिक्षकांनी 'मातृभाषा आधारित साक्षरता शिक्षणपद्धतीचा' वापर वर्गप्रक्रियेत करावा यासाठी शिक्षकांसोबत जवळून काम करण्याच्या उद्देशाने उन्नती संस्था काम करत असलेल्या केंद्रातील इयत्ता १ ते ५ मधील शिक्षकांसोबत एकूण ६ अभ्यासगट घेण्याचे ठरल्यानुसार त्याची सुरुवात ऑक्टोबर महिन्यापासून आम्ही केली. मागील खबरबात मध्ये २ अभ्यासगट झाल्याचे आम्ही कळविले होते. पुढील अभ्यासगट सांगणारा हा तक्ता -

यावेळी जिल्हा परिषदेच्या ९ शाळांतील १३ शिक्षक उपस्थित होते.

| अ.क्र. | दिनांक | वेळ | ठिकाण | विषय | तज्ज्ञ साधन व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| 1. | 21/10/2023 | 10 ते २ | रुईखेड | अभ्यासगट उद्घाटन - स्वरूप याविषयावर मुलाखत | हेमांगी जोशी , टी.सुरेश कारंडे |
| 2. | 25/11/2023 | 10 ते २ | रुईखेड | मेंदुशास्त्र आणि मुलांचे शिक्षण | डॉ.श्रुती पानसे |
| 3. | 30/12/2023 | 10 ते २ | रुईखेड | गणित - भाग -1 | विपुला अभ्यंकर |
| 4. | 06/01/2024 | 10 ते २ | रुईखेड | गणित भाग -2 | विपुला अभ्यंकर |
| 5. | 24/02/2024 | 10 ते २ | रुईखेड | शिक्षक एक उत्तम नियोजक -1 | हेमांगी जोशी , टी.सुरेश कारंडे |
| 6. | 21/03/2024 | 10 ते २ | रुईखेड | शिक्षक एक उत्तम नियोजक -2 | हेमांगी जोशी , टी.सुरेश कारंडे |







# क्षेत्र घडामोडी

## शिक्षक प्रशिक्षण (ठाणे जिल्ह्यात):

शाळांनी मागणी केल्यानुसार आम्ही काम करीत असलेल्या ४ आश्रमशाळांतील ६ शिक्षकांसाठी उन्नती संस्थेने डोअर स्टेप स्कूल, पुणे यांचे प्रशिक्षण आयोजित केले होते. शेणवे, टाकी पठार, गांडुळवाड आणि बाबरे या आश्रमशाळांतील हे शिक्षक होते. त्याचा तपशील -

| अ.क्र | दिनांक | वेळ | ठिकाण | विषय | तज्ज्ञ साधन व्यक्ती |
|---|---|---|---|---|---|
| 1. | १० व ११ जानेवारी २०२४ | १० ते ५ | उन्नती शेणवे कार्यालय | साक्षरता शिक्षणासाठी शैक्षणिक साहित्य साधन बॅग चा वापर | मनीषा भोसले, रंजिता पडवळकर |

यामध्ये त्यांनी मुलांची बेसिक क्षमता चाचणी कशी घ्यावी, क्षमतेनुसार मुलांचे गट कसे करावेत, साधन साहीत्य, भाषा बॅग यांचा वापर कसा करावा. कृती आणि खेळाच्या माध्यमातून आनंददायी शिक्षण कसे द्यावे हे शिकवले. तसेच मुलांना पडणारे प्रश्न मुलांच्या साक्षरता वर्गाचे नियोजन याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. प्रात्यक्षिक आणि कृतीद्वारे शिकवल्यामुळे ही कार्यशाळा यशस्वी झाली व अनेक शिक्षकांनी शाळेतही ही पद्धत अवलंबल्याचे निदर्शनास आले.



# संघ सक्षमीकरण

## प्रशिक्षणे

जानेवारी ते मार्च २०२४ या कालावधी दरम्यान एकूण -११ प्रशिक्षणामध्ये अकोला व शहापूर संघातील १६ सदस्यांनी सहभाग घेतला. यातील - ५ प्रशिक्षणे ही बाहेरील संस्थेमार्फत झाली व त्यामध्ये संस्थेच्या ८ संघ सदस्यांनी सहभाग घेतला. बाहेरील संस्थेमार्फत झालेली प्रशिक्षणे पुढील प्रमाणे आहेत. १) लायब्ररी एज्यूकेटर्स सटीफिकेट कोर्स (पराग, भोपाळ) २) आनंददायी शिक्षा कि ओर-भाग २ (खेळघर,पुणे) ३) Canva 101 and Branding at No Cost (आत्मा संस्थेतर्फे, आभासी) ४) वार्षिक अहवाल परिणामकारक तयार करणे (आत्मा संस्थेतर्फे, आभासी), ५) प्रोग्राम मॅनेजमेंट (आत्मा संस्थेतर्फे, आभासी)

याशिवाय संस्थेअंतर्गत झालेल्या ६ प्रशिक्षणांमध्ये १९ संघ सदस्यांनी सहभाग घेतला. प्रशिक्षणे पुढीलप्रमाणे आहेत. १) अनुभव आधारित शिक्षण, २) भविष्य निर्माण (संस्था विकसन) भाग-१, ३) लायब्ररी चे सहा स्तंभ, ४) भविष्य निर्माण (संस्था विकसन) भाग -२, ५) पुस्तक तयार करणे, ६)साक्षरता प्रशिक्षण.

## वाचन अभ्यासगट

जाने. ते मार्च २०२४ या कालावधीमध्ये कर्मचाऱ्यांचे एकूण ६ अभ्यास गट झाले. या अभ्यासगटामध्ये जानेवारी महिन्यापर्यंत एक होता कार्व्हर हे पुस्तक वाचन व त्यावर विचार विमर्श करण्यात आले. फेब्रुवारी २४ पासून तोतोचान हे पुस्तक वाचण्यास सुरुवात केली. अभ्यास गटाचा हेतू कर्मचारी स्वशिक्षण हा आहे. कामाशी जोडून असलेल्या विषयावर चर्चा झाल्याने कार्यकर्त्यांना प्रेरणा मिळते. हा अभ्यास गट आठवड्याच्या प्रत्येक गुरुवारी एक तास असे महिन्यातून चार वेळा घेणे अपेक्षित असते. यामध्ये अकोला संघातील ७ कार्यकर्ते सहभागी होते. MEL तयारी , हेमांगी यांच्यासोबत सभा, स्टाफ सभा असल्याने, मातृभाषा दिन कार्यक्रम अश्या विविध कारणांनी अपेक्षित दिवसांमध्ये अभ्यासगट घेणे शक्य झाले नाही. त्यामुळे अभ्यासगट मधून कार्यकर्त्यांचे वाचनातून होणारी चर्चा सुद्धा ६ दिवसच झाली.

# मुलांच्या गोष्टी

## गैरहजर राहणारी पूनम शाळेत येऊ लागली त्याची गोष्ट

खिरकुंड (बुद्रुक) गावातील पूनम (नाव बदलले आहे) तिसरीमध्ये शिकते. दोन आठवड्यापासून ती वर्गात अनुपस्थित होती. म्हणून पुनमकडे उन्नतीचे कार्यकर्त्याने गृहभेट केली. दोन वेळा लगातार गृहभेट केल्यावर सुद्धा तिची कार्यकर्त्याशी भेट झाली नाही कारण तो घरापाशी दिसला की ती पळून जायची. तिसऱ्या वेळी कार्यकर्त्याने सकाळीच तिच्या घरी भेट दिली, कारण सकाळी पालक भेटतात. त्यांच्याशी बोलल्यावर तिच्या शाळेत न येण्याचे व शाळेतील कुणाला घरी आलेले पाहून पळून जाण्याचे मुख्य कारण आम्हाला समजले. ते म्हणजे पुनमची आई आजारी असल्याने लहान भावाचा सांभाळ करण्यासाठी तिला घरी राहावे लागले होते, त्यामुळे बरेच दिवस तिला शाळेत येता आले नाही. इतक्या दिवस अनुपस्थित असल्याने आता शाळेत गेल्यावर शिक्षिका रागावतील किंवा मारतील अशी भीती तिच्या मनात होती. त्यामुळे घरीच राहून भावाशी ती खेळायची. हे समजल्यावर कार्यकर्त्याने संबंधित शिक्षिका यांना ही बाब सांगितली. शिक्षिका व उन्नतीचे कार्यकर्ते यांनी ठरवून मिळून पूनमच्या घरी भेट दिली. सर्वांना एकत्र आलेले पाहून पूनम घरातून बाहेर पळून गेली. पुनमची आई घरी होती. तिची आई म्हणाली कि," मी तिला शाळेत पाठविण्यास तयार आहे पण ती यायलाच तयार नाही". तेव्हा शिक्षिका व उन्नतीचे कार्यकर्ते यांनी त्यांना हमी दिली कि शाळेत तिला कुणीही ओरडणार किंवा मारणार नाही तुम्ही फक्त तिला शाळेत आणून सोडा.

दोन दिवसांनी पूनमच्या आईने स्वतः पूनमला वर्गात आणून सोडले. ती वर्गात आल्यावर सर्व मुलांनी जोरात टाळ्या वाजवून तिचे आनंदाने स्वागत केले. तसेच, तिची कलेची किट मुलांच्या हस्ते तिला दिली. आता ती स्वेच्छेने सुरळीत वर्गात व शाळेत येत आहे.



# मुलांच्या गोष्टी

आई वडील कामाला जातात म्हणून घरी लहान भावंडांना सांभाळायला लागते हे शाळांमध्ये मुलांच्या अनुपस्थितीचे प्रमुख कारण असते. गावागावांमध्ये विनामुल्य उत्तमपणे चालणारी पाळणाघरे असायला हवीत हे आम्हाला कित्येक वर्षांपासून समजले आहे. शासनाची पाळणाघर योजना नाही, असली तरी ती कार्यान्वित नाही.

आदिवासी गावांमध्ये किंवा वंचित समूहांमध्ये शाळांमध्ये मुले येती रहावीत आणि टिकावीत यासाठी मुलांकडे गृहभेटी करणे अनिवार्य असते. मुले शाळेत न येण्याची, त्यांच्या अप्रगत असण्याची कारणे त्यातून कळतात. पालकांना मुलांच्या शिक्षण प्रक्रियेत सहभागी करून घेता येते, त्यांना मुलांच्या शाळेतील performance विषयी अवगत करता येते.
उन्नतीचे शिकू आनंदे वर्ग (मातृभाषा आधारित बहुभाषिक शिक्षण वर्ग) वर्षभर चालतात. आठवड्यातील दोन दिवस (मंगळवार व बुधवार) हे मुलांच्या गृहभेटींसाठी राखून ठेवलेले असतात.

## पुस्तकातील चित्रे मुलांना वाचनाकडे आकृष्ट करतात - सीमा गिरा हिची गोष्ट

एकीकडे शाळेतील मुलांची वाचनाची आवड आणि कला लोप पावत असताना, उन्नती चालवत असलेल्या लायब्ररी उपक्रमांमुळे मुली-मुले पुन्हा वाचनालयाकडे आकर्षित होत असल्याचे दिसते. त्यातही चित्र असलेली पुस्तके मुलांना वाचनालयात खेचून आणतात हे सीमा गिरा या विद्यार्थ्यावरून दिसून येते.
सीमा ही टाकी पठार आश्रमशाळेत ५ वी मध्ये शिकणारी चुणचुणीत मुलगी आहे. तिचे आई-वडील घाटावर मजूर म्हणून काम करतात. तर सीमा तिच्या दोन लहान भावंडासोबत शाळेत वसतिगृहात राहते. सीमा वाचनालयाची विद्यार्थिनी आहे. दर आठवड्यात वाचनालय उपक्रमाअंतर्गत स्वतंत्र वाचनाचा तास घेतला जातो. यामध्ये मुलांनी वर्गातील डिस्प्लेमधून आवडीचे पुस्तक निवडून वर्गातील किंवा वर्गा बाहेरील मोकळ्या वातावरणात कुठेही बसून हे पुस्तक वाचायचे असते. अशाच एका वर्गात सीमा गिरा आली. येण्यापूर्वीच तिने कोणते पुस्तक निवडायचे हे ठरवले होते.

# मुलांच्या गोष्टी

वर्गात येताच तिने “धम्माल रविवार” हे पुस्तक शोधण्यास सुरुवात केली. परंतु तिचे लक्ष जाण्यापूर्वीच जयेशने ते पुस्तक वाचण्यास घेतले होते. तिने त्याच्याकडे ते पुस्तक मागितले. परंतु ते पूर्ण वाचून झाल्याशिवाय देणार नाही असे त्याने सांगितले. सीमा थोडी नाराज झाली आणि जाऊन वाचनालय वर्गाच्या एका कोपऱ्यामध्ये बसली. मुलींबरोबर मुलांबरोबर काहीही बोलत नव्हती. सतत बडबडणारी, नियमित पुस्तक वाचणारी सीमा आज अशी का बसली म्हणून शाळासखी अश्विनीने तिच्याशी संवाद साधला. तिने तिला सांगितले की पुस्तक छोटे आहे, तो देईल पटकन वाचून. पण सीमाला ते मान्य नव्हते. तेव्हा ताईने तिला सांगितले की ती तिला हॉस्टेमध्ये हे पुस्तक वाचायला देईल. तेव्हा तू हवे तेवढ्या वेळा हे पुस्तक वाचू शकतेस. हे एकून तिची कळी खुलली आणि सीमाने दुसरे “रंगांचा उत्साह” हे वाचण्यासाठी घेतले. पण तिचं मन त्या पुस्तकामध्ये रमत नव्हते आणि ते अश्विनी ताईला समजले होते. नेमके हे पुस्तकच सीमाला का हवे होते, हे समजण्यासाठी अश्विनीने पुन्हा तिच्य़ाशी संवाद साधला. त्यावेळी तिने सांगितले की सातवीच्या वर्गावर एकदा पुस्तक देवघेव दरम्यान हे पुस्तक सातवीच्या सोनाली दीदीने हॉस्टेलमध्ये वाचायला आणले होते. ती ते पुस्तक रात्री वाचत असताना त्यातील मोठी मोठी चित्रे सीमाने पाहिली आणि त्यातील मोठी मोठी वाक्येही दिसली. तिने ती वाचली आणि तिला ते पु्स्तक फारच आवडले.

हॉस्टेलच्या मुलींचा रविवारही इतर दिवसांच्या तुलनेत थोडा आरामदायी असतो. त्यामुळे ते पुस्तक तिने स्वत:शी ताडून पाहिले होते. त्यातील ती मोठी मोठी चित्रे तिला खुणावत होती. पुस्तकातील बंटी हे पात्र आणि त्याने केली मज्ज्जा तिला समजली होती. तिलाही तशीच मज्जा करायची होती. एका पुस्तकाचे कुतुहल, त्यातील जगण्याचे कुतुहल त्या निमित्ताने जागृत झाल्याचे दिसत होते.





**उन्नतीचे  शिक्षिक वर्गात मुलांना एक गोष्ट सांगत असताना**



**वर्गात शिक्षकांसोबत गाणे गाताना मुलांचा व्हिडिओ**

**OUR BANKER:**
PUNJAB NATIONAL BANK, M. G. ROAD, THANE (WEST) MAH. 400602

**ACCOUNT NAME:**
UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE

**SAVINGS AC NO.:**
3739 0001 0064 2890

**IFSC :** PUNB0373900

**QR CODE FOR DONATIONS:**

**YOU MAY ALSO DONATE IN TWO INSTALMENTS IN A YEAR.**


उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

पत्ता- उन्नती संस्था, ४०२, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ, टिळक नगर,
डोंबिवली पूर्व, ४२१२०१

unnati.isec@gmail.com
9892103371
https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL